# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व सामाजिक विचार

देशाच्या आर्थिक अधोगतीला सामाजिक व्यवस्थेची चौकट जबाबदार आहे. जातीव्यवस्थेच्या उतरंडीमुळे देशातील असंख्य घटकांना विविध उत्पादन ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले, त्यामुळे त्यांच्यात सर्वांगीण बदल झाला नाही, असे प्रतिपादन मू.जे.महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा.देवेंद्र इंगळे यांनी केले.




मू.जे.महाविद्यालयातील अर्थशास्त्र व नियोजन मंडळाच्या संयुक्त विद्यमाने ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व सामाजिक विचार’ या विषयी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी मंचावर विभागप्रमुख डॉ.महेश बडवे, डॉ. एन. एस. बोरसे. प्रा. के.के.वळवी, नियोजन मंडळ चेअरमन प्रा.डी.आर.वसावे उपस्थित होते.

प्रा.इंगळे म्हणाले की, देशातील जमिनीचे वाटप अतिशय विषम पद्धतीने झाले आहे. जातीव्यवस्था ही श्रमाची विभागणी नाही तर श्रमिकांची विभागणी आहे. सर्व उत्पादक जातींना त्यांच्या क्षमतेनुसार संधी उपलब्ध झाल्या नाहीत असेही ते म्हणाले.



प्रास्ताविक डॉ.एन.एस.बोरसे, सूत्रसंचालन डॉ.एल.एन.तायडे, आभार प्रा.डी.आर.वसावे यांनी केले. प्रा.अमोल बावस्कर, प्रा.एफ.यु.कोचुरे यांचेसह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.